# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक १६.०९.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक १५.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण १,०५,७४५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करून एकुण ४१,८२०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५७१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १५,६१,२००/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :– अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १६.०९.२०२६ चे ०१.२५ वा. ते ०२.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, रामदेवबाबा टेकडीमागे, योगेंद्र नगर, कच्चा रस्त्यावर एक हिरव्या रंगाचे फुल टि–शर्ट व करड्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला ईसम अग्नीशस्त्रासह फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अमन त्रिवेणीप्रसाद गुप्ता, वय २३ वर्षे, रा. भैरवगंज, तह. पट्टी, जि. प्रतापगढ (उ.प्र.) ह.मु.– सुल्तान शफी शेख चे घरी किरायाने, योगेंद्र नगर, गिट्टीखदान, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे उजव्या खिशात एक जिवंत काडतुस तसेच कमरेचे समोरील बाजुस खोचलेले ०१ अग्नीशस्त्र मिळुन आले. आरोपीचे ताब्यातुन ०१ अग्नीशस्त्र व ०१ जिवंत काडतुस व मोबाईल फोन असा एकुण किंमती ७६,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ३,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्‌देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत

क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा. गणेश जागेकर, विवेक अढाऊ, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड व नितीन साळुंके यांनी केली.



**३) कळमना पोलीसांची कामगीरी :— ई—रिक्षा वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १३.०९.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक १४.०९.२०२६ चे ०६.०० वा. दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. २१, बालाजी नगर, कळमना गांव, कल्लनमियॉ शाळेमागे राहणारे फिर्यादी तरूण उर्फ बंटी आनंद शिवरकर, वय ३७ वर्षे यांनी त्यांचे राहते घरासमोर त्यांची हिरव्या रंगाची मॅक्सी ई—रिक्षा क्र. एम. एच. ४९ एआर ९६९२ किंमती ६०,०००/—रू. ची लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची ई—रिक्षा चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, कळमना पोलीसांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या माहीतीवरून, आरोपीचे नांव निष्पन्न केले. आरोपी नामे जफर शेख मोहम्मद नियाज, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ६१, प्रियांशु हॉटेल मागे कळमना, नागपुर यास चिखली ले—आऊट येथुन चोरी केलेल्या ई—रिक्षासह ताब्यात घेतले. त्यास गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी निलेश प्रकाश दराडे, वय ३६ वर्षे, रा. नाका नं. ४ मागे, तिडकेचे घराजवळ, कळमना याचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीस गुन्ह्यात अटक करून, त्याचे ताब्यातुन चोरी केलेले ई—रिक्षा वाहन किंमती ६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि.क्र.५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. गुन्हे करीम पठाण, सपोनि. अजय जाधव, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदीप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव व प्रफुल्ल गोहोकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— अकस्मात मृत्युचे चौकशीत दाखल खुनाचे गुन्ह्यातील ०३ आरोपींना अटक.</u>**

फिर्यादीचा लहान भाऊ नामे शंकर मनोहरराव कुकडे, वय ३६ वर्षे, रा. नांदगांव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा हा नागपुर येथे लेबर कामे करतो व बांधकाम साईडवर हल्ली मुक्कामी राहतो व काम नसल्यास मुळ गावी फिर्यादीसोबत राहतो. दिनांक १४.०९.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, वर्धा रोड, तृप्ती बार जवळ फिर्यादीचा भाऊ हा डोक्याला मार लागलेल्या जखमी बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले. बेलतरोडी पोलीसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद घेतलेली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीदरम्यान, बेलतरोडी पोलीसांनी सर्वप्रथम मृतकाची ओळख पटविली व तो वर्धा रोड बांधकाम साईडवर राहत होता असे समजले. पोलीसांनी घटनास्थळी व परिसरातील सिसिटीव्ही फुटेज चेक करून तांत्रीक तपास केला असता, मृतकाचे व त्याचे साथीदार आरोपी क्र. १) सनी संताराम गायकवाड, वय २३ वर्षे २) रोहीत रामेश्वर खुजणारे, वय २३ वर्षे, ३) तुषार संजय खंडारे, वय २३ वर्षे, सर्व रा. कैकाडी नगर झोपडपट्टी, बेलतरोडी, नागपुर यांचे सोबत दारूचे नशेत शुल्लक कारणावरून आपसांत भांडण होवुन, त्यांचेमध्ये शिवीगाळ केल्याचे कारणावरून, आरोपींनी फिर्यादीचे भावास ढकलुन खाली पाडले व त्यास लाथ—बुक्यानी मारल्याने त्याचे डोक्याला मार लागुन तो बेशुध्द होवुन मृत झाल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी अकस्मात मृत्युचे चौकशी व फिर्यादी प्रमोद मनोहरराव कुकडे, वय ४४ वर्षे, रा. नांदगांव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे सपोनि. सचिन निंबाळकर ९४२३५६४२८९ यांनी आरोपींविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदवुन, तिन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पाचपावली :—शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १५.०९.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, वैशाली नगर, रेल्वे लाईन जवळ एक इसम येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळी करुन, धुमाकुळ घालत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन जवळ एक ईसम हातात शस्त्र घेवुन धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील एक लोखंडी चाकु किंमती ३००/—रू. चा मुद्देमाल काढुन घेवुन जप्त करून, त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव फलाश चेतन भिमटे, वय २० वर्षे, रा. घर नं. ७४१४, बारसे नगर, पाचपावली, नागपुर असे सांगीतले.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने फिर्यादी पोहवा. विनोद समदुरे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे मपोउपनि. नुतन जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १५.०९.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादी प्रकाश भिमराव देशमुख, वय ६० वर्षे, रा. धनगवळीबाबा नगर, खरबी, नागपुर हे त्यांची पत्नी सौ. अनिता प्रकाश देशमुख, वय ५५ वर्षे ह्यांना मागे बसवुन त्यांचे स्प्लेंडर प्लस दुचाकी क्र. एम.एच. ४० एस २६८७ ने मौदा येथे जात असतांना, पोलीस ठाणे पारडी हद्दीत, जबलपुर हायवे रोड, नागपुर कटींग जवळील खालसा ढाब्याचे समोर कंटेनर ट्रक वाहन क्र. एनएल ०१

एएच ५७८५ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे दुचाकीला मागुन धडक देवुन घटनास्थळावरून पळुन गेला. फिर्यादी व त्यांची पत्नी दोघेही खाली पडल्याने फिर्यादी हे गंभीर जखमी व त्यांची पत्नीचे डोक्यावरून वाहनाचे चाक गेल्याने त्या जागीच मरण पावल्या. गंभीर जखमी फिर्यादी यांना उपचार लाईफ लाईन हॉस्पीटल वाठोडा येथे सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. सचिन जाधव ९१४५४३६०५४ यांनी कंटेनर चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४(अ)(ब), १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**